पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांच्या आस्थापनेवरील अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय,क्रमांक: मपुवि - २०१९/ प्र.क्र.२८/सांका.-२.
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २३ सप्टेंबर, २०१९.

संदर्भ : १. वित्त विभाग शासन निर्णय क्र. असंक-१००४/प्र.क्र. १२(भाग-२)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि. ४.१०.२००४.
२. समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्र. संकीर्ण-२००१/प्र.क्र. २९८/सां.का.२, दि. २३.३.२००६.
३. वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दि. ५.३.२०१८.
४. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र. मपुवि-२०१९/प्र.क्र.२८/सां.का.२, दि. ६.०३.२०१९.
५. संचालक, पुराभिलेख संचालनालय यांचे पत्र जा.क्र. हंपमु/१०/प्रशा/२०१९/२८४७, दि. ०९.०९.२०१९.
६. वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दि. ११.०९.२०१९.

शासन निर्णय :-

या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील पुराभिलेख संचालनालयाच्या आस्थापनेवरील ४१ अस्थायी पदे दि. ३०.९.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास संदर्भाधिन क्रमांक ४ येथील दि. ०६.०३.२०१९ च्या शासन निर्णयानुसार मंजूरी देण्यात आली होती. आता संचालक, पुराभिलेख संचालनालय यांनी संदर्भ क्र. ५ येथील पत्रान्वये त्यांच्या आस्थापनेवरील ४१ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णयानुसार वित्त विभागाने अस्थायी पदांना दि. १.१०.२०१९ ते दि. २९.०२.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत प्रशासकीय विभागास अधिकार प्रदान केले आहेत. पुराभिलेख विभागाकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील अटींच्या अधीन राहून पुराभिलेख संचालनालयातील सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या ४१ अस्थायी पदांना दि. १.१०.२०१९ ते दि. २९.०२.२०२० पर्यंत पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे:-

१) ज्या प्रयोजनार्थ ही पदे निर्माण केली आहेत त्याच प्रयोजनार्थ त्या पदाचा विनियोग करण्यात यावा.
२) या पदांपैकी कोणतेही पद सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त नाही.
३) या पदांवरील अपेक्षित खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

२. याबाबतचा खर्च "मागणी क्र. झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती (००) १०४ पुराभिलेख (०१) (०२) पुराभिलेख कार्यालय (२२०५ १७९५) (०१) वेतन या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर आर्थिक तरतूदीतून भागविण्यात येईल. वित्त विभाग शासन निर्णय दि. ११.०९.२०१९ अन्वये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करावी.

३. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र. असंक-१००४/प्र.क.१२ (भाग-२)/२००४/ वित्तीय सुधाराणा-१, दि. ४.१०.२००४ व वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि २०१६/ प्र.क्र.८/ १६/ आ.पु.क. दि. ११.०९.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान केलल्या अधिकारानूसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९२३१२३९४४८५२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Sawant Balasaheb Ishwar
Date: 2019.09.23 12:43:16 +05'30'

(बाळसाहेब ईश्वर सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई.
२. महालेखापाल महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुबई.
५. वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
६. कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प) पर्यटन व सांस्कृतिक विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. पुराभिलेख कार्यालय पुणे/कोल्हापूर/नागपूर/औरंगाबाद (संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)
८. जिल्हा कोषागार कार्यालय पुणे/ कोल्हापूर/ नागपूर/ औरंगाबाद.
९. निवड नस्ती.-सां.का.२.

पुराभिलेख संचालनालय, मुंबई अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत...

शासन निर्णय क्रमांक- मपुवि-२०१९/प्र.क.२८/सां.का.२, दि. २३ सप्टेंबर, २०१९ चे सहपत्र.

अ. क्र.	पद	वेतनस्तर	मुंबई पुराभिलेख कार्यालय	पुणे पुरालेखागार पुणे	कोल्हापूर पुरालेखागार कोल्हापूर	मराठवाडा पुरालेखागार औरंगाबाद	विदर्भ पुरालेखागार नागपूर	एकूण अस्थायी पदे
१.	सहाय्यक संचालक	S-१५, रु. ४१८००-१३२३००	-	१	१	१	१	४
२.	अभिलेखाधिकारी	S-१४, रु. ३८६००-१२२८००	१	-	-	-	-	१
३.	मुख्य छायाचित्रकार	S-१४, रु. ३८६००-१२२८००	१	-	-	-	-	१
४.	छायाचित्रकार	S-१०, रु. २९२००-९२३००	२	-	-	-	-	२
५.	संशोधन सहाय्यक	S-८, रु. २५५००-८११००	१	-	-	-	-	१
६.	अभिलेखपाल	S-८, रु. २५५००-८११००	-	-	१	-	-	१
७.	अलमारीवाला	S-८, रु. २५५००-८११००	१	-	-	-	-	१
८.	संकलक	S-८, रु. २५५००-८११००	१	-	-	-	-	१
९.	सहाय्यक छायाचित्रकार	S-८, रु. २५५००-८११००	२	-	-	-	-	२
१०.	लिपिक/लिपिक टंकलेखक/इंग्रजी टंकलेखक	S-६, रु. १९९००-६३२००	५	-	-	-	-	५
११.	अभिलेख परिचर	S-६, रु. १९९००-६३२००	१	-	-	-	-	१
१२.	वरिष्ठ डागडूजीकार	S-६, रु. १९९००-६३२००	१	-	-	-	-	१
१३.	सहाय्यक पुस्तकबांधक	S-५, रु. १८०००-५६९००	२	-	-	-	-	२
१४.	तंत्रज्ञ-मदतनीस	S-६, रु. १९९००-६३२००	२	-	-	-	-	२
१५.	दप्तरी/फायलर/दप्तरबंद	S-३, रु. १६६००-५२४००	४	-	१	-	-	५
१६.	डागडूजीकार	S-३, रु. १६६००-५२४००	२	-	१	-	-	३
१७.	शिपाई	S-१, रु. १५०००-४७६००	१	-	-	-	-	१
१८.	अभिलेखवाहक	S-१, रु. १५०००-४७६००	६	-	१	-	-	७
	एकूण पदे		३३	१	५	१	१	४१

Digitally signed by Sawant Balasaheb Ishwar
Date: 2019.09.23 12:43:32 +05'30'

(बाळासाहेब ईश्वर सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.